आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

११ डिसेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४ चं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण, राज्यातल्या ३ ग्रामपंचायती, १ पंचायत गट, आणि यशदा संस्था पुरस्कारानं सन्मानित

- सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीला आज देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरुवात /देशातले युवक सरकारला साथ देत देशासमोरच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काम करत असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे कौतुकोद्गार

- महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याची रेल्वेमंत्र्यांची लोकसभेत माहिती

**आणि**

- संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण संस्थेचा चॅम्पियन ऑफ अर्थ जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना जाहीर

**<><><><><>**

राष्ट्रीय पंचायत पुरस्कार हे पंचायतींच्या समर्पणाचं आणि प्रयत्नांचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४ चं वितरण आज नवी दिल्लीतल्या विज्ञान भवन इथं राष्ट्रपतींच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. या वर्षी विविध श्रेणींमध्ये एकंदर ४५ पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात आली. ओडिशा आणि त्रिपुरा या राज्यांना सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी सात पुरस्कार मिळाले.

तर महाराष्ट्राला सहा पुरस्कार मिळाले. यामध्ये पंचायत क्षमता निर्माण श्रेणीत पुण्यातल्या यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी-यशदाला तृतीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीनं नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार, तसंच ग्राम उर्जा स्वराज विशेष ग्राम पंचायत अशा दोन पुरस्कारांवर आपलं नाव कोरलं आहे. गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गटाला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी गट अंतर्गत मोडाळे ग्रामपंचायतीला दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत स्वच्छ आणि हरित ग्राम पंचायत हा तृतीय क्रमांकाचा, तर भंडारा जिल्ह्यातल्या बेला ग्रामपंचायतीला कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत श्रेणीत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

<><><><><>

देशातले युवक सरकारला साथ देत देशासमोरच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काम करत आहेत, त्यामुळे भारत विकसित होण्याच्या मार्गावर आहे, याबद्दल आपल्याला विश्वास वाटतो असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. हॅकेथॉनमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला. यंदाच्या हॅकेथॉनमध्ये ५७ हजार नव्या कल्पना विद्यार्थ्यांनी मांडल्या. या कल्पना देशासमोरच्या समस्या सोडवण्यासाठी उपयोगी ठरत आहेत. अनेक मोठ्या समस्यांवर या हॅकेथॉनमुळे तोडगा निघाला आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. देशातले युवा

आपल्यासमोरील प्रश्नांचं उत्तर शोधण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करत आहेत, असं कौतुक त्यांनी केलं....

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री**

त्याआधी विद्यार्थ्यांच्या नवकल्पना प्रधानमंत्र्यांनी जाणून घेतल्या. तामिळनाडूमधल्या खरगपूर इथल्या विद्यार्थ्यांनी सायबर हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी यंत्रणा विकसित केली आहे. गुजरातमधल्या अहमदाबाद इथल्या विद्यार्थ्यांनी चंद्राच्या दक्षिण ध्रुवाच्या प्रतिमा टिपण्यासाठी तर बंगळुरूमधल्या विद्यार्थ्यांनी नदी प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी यंत्रणा विकसित केली आहे. या सर्व विद्यार्थ्यांच्या कल्पनांचं प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी आज देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरु झाली. यात राज्यातल्या चार केंद्रांचा समावेश आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दूरस्थ माध्यमातून याचं उद्घाटन केलं. देशातले विद्यार्थी हेच विकसित भारताचे चालक असल्याचं प्रधान यांनी यावेळी सांगितलं. युवावर्गाची बुद्धिमत्ता, व्हिजन, मेहनत, उत्साह, नेतृत्वगुण आणि नवोन्मेष यामुळे २१ व्या शतकातली ज्ञानाधारित अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय होईल आणि अनेक विकसनशील देशांसाठी ते आदर्श विकास प्रारूप ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आज झालेल्या अंतिम फेरीत महाराष्ट्रातल्या मुंबई, पालघर, बुलडाणा, नांदेड, कोल्हापूर, नाशिक धुळे, पुणे, नागपूर, वर्धा, सोलापूर, ठाणे, सांगली आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमधल्या सुमारे तेराशे

विद्यार्थ्यांचा समावेश होता. यात मुंबईतल्या वेलिंगकर संस्थेतले ३४ संघ गृह मंत्रालय, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या सहा समस्यांचं निराकरण करण्यासाठी काम करत आहेत. याविषयी केंद्रप्रमुख निलेश लेले यांनी माहिती दिली.

<><><><><>

लोकसभेत आज रेल्वे सुधारणा विधेयक, २०२४ आवाजी मतदानानं संमत झालं. रेल्वे नियम १९८९ मध्ये सुधारणा करण्याची तरतूद या विधेयकात आहे. यामुळे रेल्वे बोर्डाची अधिकारक्षमता तसंच स्वायत्तता वाढेल. रेल्वेच्या कायदेशीर चौकटीचं सुलभीकरण करण्याच्या दृष्टीनं हे विधेयक मांडल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी बोलताना सांगितलं. गेल्या १० वर्षांमध्ये रेल्वेसंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले, वंदे भारत, नमो भारत, अमृत भारत सारख्या आधुनिक रेल्वेगाड्या सुरु करण्यात आल्या, रेल्वेइंजिनांवर टक्कर विरोधी कवच यंत्रणा बसवण्याचं काम प्रगतीपथावर आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

दळणवळण मंत्रालयानं भारत सिक्स जी व्हिजन नुसार कृती योजना बनवण्यासाठी भारत सिक्स जी आघाडी गठीत केली आहे. दळणवळण राज्यमंत्री डॉक्टर पी. चंद्रशेखर यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात याबद्दलची माहिती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारत सिक्स जी व्हिजन नुकतंच प्रकाशित केलं होतं. २०३० सालापर्यंत सिक्स जी तंत्रज्ञानाचं आरेखन, विकास आणि अंमलबजावणी यात भारत जगात अव्वल स्थान मिळवेल, असा विश्वास यात व्यक्त करण्यात आला आहे.

भारत चणा आणि चणाडाळ या ब्रँडखाली किरकोळ विक्री करण्यासाठी तीन लाख टनांहून अधिक चणाडाळीचा अतिरिक्त साठा मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री बी एल वर्मा यांनी आज लोकसभेत एका लिखित उत्तरात दिली.

<><><><><>

महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. राज्यात रेल्वेला प्रत्येक स्थानकावर थांबा देण्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. पुण्याहून रेल्वे मार्गाचं दुहेरीकरण तसंच तिहेरीकरणाचं काम सुरु असून, रेल्वेचं जाळं मोठ्या प्रमाणात विस्तारण्यात येणार आहे. त्यानंतर रेल्वे थांबे वाढवण्यात येणार असल्याचं वैष्णव म्हणाले. राज्यात रेल्वेशी संबंधित कामं योग्य रितीने सुरू असल्याचं सुळे यांनी नमूद केलं.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण संस्था असलेल्या UNEP चा चॅम्पियन ऑफ अर्थ जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना जाहीर झाला आहे. पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी काम करणाऱ्यांना तसंच, जागतिक हवामान बदल, दुष्काळ आणि जमिनीचा खालावत चाललेला दर्जा याविरोधात काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कारानं सन्मानित करण्यात येतं.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये, आज पर्थ इथं झालेल्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर ८३ धावांनी विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून यजमान ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. ऑस्ट्रेलियानं निर्धारित ५० षटकात ६ गडी गमावून २९८ धावा केल्या. एनाबेला सिदरलँडच्या ११० धावांच्या तडाखेबंद खेळीमुळे ऑस्ट्रेलियाला ही मजल गाठता आली. भारतातर्फे रेड्डीनं चार, तर दीप्ती शर्मानं एक बळी मिळवला.

विजयासाठी २९९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सलामीच्या जोडीतली रिचा घोष ५ व्या षटकातच २ धावांवर बाद झाली. मात्र त्यानंतर आलेल्या हर्लीन देऊलच्या साथीनं स्मृती मंधनानं धावफलक हलता ठेवला. दुसऱ्या गड्यासाठी या दोघींनी ११८ धावांची भागीदारी केली. हर्निल ३९ धावा काढून बाद झाल्यानंतर मात्र, इतर खेळाडूंकडून फारशी साथ मिळाली नाही. स्मृतीनं १०५ धावा केल्या.

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आजही राज्यसभेत सत्ताधारी आणि विरोधक यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांवर गदारोळ होऊन सभागृहाचं कामकाज आधी बारा वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब झालं. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांच्यावरचा अविश्वास ठराव फेटाळून लावला. काँग्रेसनं अध्यक्षपदाचा अनादर केला असून त्यासाठी त्यांनी माफी मागावी, अशी मागणी संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केली. जे पी नड्डा यांनी सोनिया गांधी आणि जॉर्ज सोरोस

यांच्यातल्या संबंधांचा मुद्दा मांडत यावर चर्चा घेण्याची मागणी केली. हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेचा मुद्दा असल्याचं ते म्हणाले.

लोकसभेतही सत्ताधारी पक्षानं या मुद्द्यावरून काँग्रेसवर टीकेची झोड उठवली. परदेशी शक्तींशी हातमिळवणी करून भारताची अर्थव्यवस्था कमकुवत करण्याचा काँग्रेसचा डाव आहे, असा आरोप केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी केला.

<><><><><>

केंद्र सरकार आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेवर नियंत्रण आणणारा कायदा करण्याच्या विचाराधीन असून, यावर सभागृहाचं एकमत अपेक्षित असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशात एक व्यापक भारत एआय मिशन सुरू करण्यात आलं असून, त्यात एआय कंप्युट सुविधा निर्माण करणं, कौशल्य फ्रेमवर्क, स्टार्ट-अप्ससाठी वित्तपुरवठा, इनोव्हेशन सेंटर, डेटासेट प्लॅटफॉर्म तयार करणं आणि नवीन ॲप्लिकेशन तयार करणं यावर भर असेल यासंदर्भात अन्य एका प्रश्नावर उत्तर देताना वैष्णव यांनी, छत्रपती संभाजीनगर इथं कृत्रिम ॲप्लिकेशनचं काम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

<><><><><>

मुंबईतल्या कुर्ला बस अपघाताची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई इलेक्ट्रिक वाहतूक परिवहन मंडळानं चार सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. चालकानं सुरक्षा नियमांच पालन केलं होतं की नाही किंवा बसमध्ये काही तांत्रिक बिघाड होता यासंदर्भातील चौकशी ही समिती करेल.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. विदर्भात काही ठिकाणी लक्षणीय, तर कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली.

राज्यात सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं ९ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरड राहिल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//